# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरात होणाऱ्या हिवाळी अधिवेशन २०२५ करीता
**{ वाहतुक विभाग }** शहरातील रस्ता दुभाजक व फुटपाथ चे दुरूस्ती व रंगरंगोटी करण्याकरीता रु. २९,९६,४०३/- (एकोनतीस लक्ष, छयान्नव हजार, चारशे तीन फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८१८ (३७२) अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई-निविदा बोलाविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-**

१) या कामास्तव रु. २९,९६,४०३/- रक्कमेला मा. अधिक्षक अभियंता यांनी S.E./PWD/T.S./२३३/२०२५-२६ दिनांक १५/१०/२०२५ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

२) प्रस्तुत कामाकरीता सन २०२५-२६ चे आय-व्ययकातील पद क्र. A२२५०१५३०८१८ अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.

३) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 381/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 13/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, वाहतुक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात होणाऱ्या हिवाळी अधिवेशन २०२५ करीता शहरातील रस्ता दुभाजक व फुटपाथ चे दुरूस्ती व रंगरंगोटी करण्याकरीता रु. २९,९६,४०३/- (एकोनतीस लक्ष, छयान्नव हजार, चारशे तीन फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८१८ (३७२) अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई-निविदा बोलाविण्यास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.